# टिळक महाराष्ट्र विद्यापीठ,पुणे
## एम.ए. (मराठी/हिंदी) एप्रिल/मे २०१७ परीक्षा निकाल
## सूचना पत्र

दि. २३ जुलै २०१७

विद्यार्थी मित्रांनो,

सोबत आपल्या एप्रिल/मे २०१७ परीक्षेच्या निकालाची गुणपत्रिका पाठवित आहोत.

- सर्व यशस्वी उमेदवारांचे अभिनंदन ! आणि सर्व विद्यार्थ्यांना शुभेच्छा !
- खालील सूचना काळजीपूर्वक वाचून त्यांची कार्यवाही करावी.

### सर्वसाधारण सूचना

**पुनर्मूल्यमापन व गुणांची फेरमोजणी**

विद्यार्थी पुनर्मूल्यमापन वा गुणांच्या फेरमोजणीसाठी अर्ज करु शकतात. तपशील पुढीलप्रमाणे :-

**शुल्क** : पुनर्मूल्यमापन प्रति विषय रु. २६०/-
: गुणांची फेरमोजणी - प्रति विषय रु. ११०/-

**अंतीम दिनांक : १५ जुलै २०१७**

(सदर शुल्क कोणत्याही परिस्थितीत परत केले जाणार नाही. तसेच मुदतीनंतर अर्ज स्विकारले जाणार नाहीत याची कृपया नोंद घ्यावी.)

**अर्ज खालील पत्त्यावर पाठवावा.**
**कुलसचिव, परीक्षा विभाग, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, गुलटेकडी, पुणे ४११०३७**

**शुल्क भरण्याची पध्दत-** सर्व शुल्क पुणे कार्यालयामध्ये महाराष्ट्र बँकेद्वारा रोख स्वरुपात भरता येते. पुणे व अन्य केंद्रावरील विद्यार्थ्यांनी डिमांड ड्राफ्टद्वारे शुल्क भरताना ड्राफ्ट '**कुलसचिव, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ,पुणे'** या नांवे काढावा, तर मुंबई व ठाणे केंद्रातील विद्यार्थ्यांनी डिमांड ड्राफ्ट '**कुलसचिव, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ,मुंबई** ' या नावे काढावा. केवळ राष्ट्रीयकृत बँकेचाच डिमांड ड्राफ्ट स्वीकारला जातो.

**श्रेणीसुधार**- उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी श्रेणीसुधार सुविधा उपलब्ध आहे. सदर सुविधेसंदर्भात खालील बाबींची नोंद घ्यावी.

- एम.ए. अभ्यासक्रम उत्तीर्ण झाल्यावरच श्रेणी सुधारसाठी अर्ज करता येईल.
- श्रेणी सुधारसाठी अभ्यासक्रम पूर्ण होताच लगोलगच्या ५ परीक्षांपैकी ३ परीक्षांना बसणे अपेक्षित असते.
- संबंधित विद्यार्थ्यांने किमान १/३ पेपर्स पुन्हा देणे अपेक्षित आहे. (परीक्षा शुल्क प्रति विषय रू. ५००/-)
- या पुर्नपरीक्षांमध्ये श्रेणी सुधार न झाल्यास पुर्नपरीक्षांचा निकाल ग्राह्य धरला जात नाही.
- श्रेणी सुधार केलेला विद्यार्थी कोणतेही पारितोषिक वा अन्य सुविधांसाठी पात्र धरला जात नाही.

# <u>कॅटगरीनुसार सूचना</u>

सध्या एम.ए. मराठी अभ्यासक्रमाच्या विविध कॅटगरी आहेत. त्यानुसार खाली सूचना दिलेल्या आहेत. या सूचना काळजीपूर्वक वाचा आणि त्यानुसार पुढील कार्यवाही करा.

<table>
<tr><th rowspan="2">कॅटगरी</th><th rowspan="2">एप्रिल/मे २०१७ मध्ये झालेल्या परीक्षा</th><th rowspan="2">उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी सूचना</th><th colspan="2">FAIL/ATKT प्राप्त विद्यार्थ्यांसाठी सूचना</th></tr>
<tr><th>अंतर्गत मूल्यमापनाचा बॅकलॉग असलेले विद्यार्थी</th><th>परीक्षेचा बॅकलॉग असलेले विद्यार्थी</th></tr>
<tr><td>D<br>(सत्र पध्दती)<br>२०१६-१७ मध्ये प्रवेश घेतलेले विद्यार्थी</td><td>सत्र २ व ४<br><br>सत्र १(बॅकलॉग)<br>सत्र ३(बॅकलॉग)</td><td>प्रथम व द्वितीय दोन्ही वर्ष उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनी पदवी प्रमाणपत्रासाठी अर्ज करावा. (प्रोव्हिजनल पासिंग सर्टिफिकेट सोबत जोडले आहे.)सदर अर्ज भरून रु. ३०० इतक्या पदवीप्रदान शुल्कासोबत ३० जुलै २०१७ पर्यंत परीक्षा विभागात पाठवावा.</td><td>*प्रथम/व्दितीय वर्षाच्या बॅकलॉगसाठी परीक्षा अर्ज भरावा. त्यास गुणपत्रिकेची स्वयंसाक्षांकित प्रत जोडावी आणि रु. ५० प्रति विषय याप्रमाणे शुल्क भरावे.<br>*परीक्षा अर्ज सादर करण्याची अंतीम तारीख - १० जुलै २०१७ (विना विलंब शुल्क) १७ जुलै २०१७ (विलंब शुल्कासह).<br>* प्रथम/व्दितीय वर्षाचे गृहपाठ सादर करावेत.<br>* प्रथम/व्दितीय वर्षाचे गृहपाठ सादर करण्याची अंतीम तारीख -१५ ऑक्टोंबर २०१७ (विना विलंब शुल्क), ३१ ऑक्टोंबर २०१७ प्रति विषय रु. ५०/- विलंब शुल्कासह (प्रकल्पासाठी बॅकलॉग शुल्क रू.१००/- विलंब शुल्क रु. १००/-)</td><td>*प्रथम/व्दितीय वर्षाच्या पेपरची परीक्षा पुन्हा देण्यासाठी<br>* बॅकलॉगाचा फॉर्म भरून रु. १०० प्रति विषय इतके शुल्क भरावे. अर्जास गुणपत्रिकेची स्वयंसाक्षांकित प्रत जोडावी.<br>* अर्ज भरण्याची अंतीम मुदत - १० जुलै २०१७ (विना विलंब शुल्क) १७ जुलै २०१७ (विलंब शुल्कासह).</td></tr>
<tr><td>D<br>(सत्र पध्दती)</td><td>प्रथम वर्ष विद्यार्थ्यांकरिता</td><td colspan="3">प्रथम वर्षाचे उत्तीर्ण, अनुतीर्ण व अनुपस्थित विद्यार्थी व्दितीय वर्षाला प्रवेश घेऊ शकतात.<br>व्दितीय वर्ष प्रवेश शुल्क - ८,२५०/- मुंबईकरिता ९,२५०/-<br>प्रवेशाची मुदत- १० जुलै २०१७ पर्यंत विना विलंब शुल्क.<br>१७ जुलै २०१७ रू. २००/- विलंब शुल्कासह.</td></tr>
<tr><td rowspan="4">C*<br>(वार्षिक पध्दती ६०:४० पॅटर्न) २०१४-१५ मध्ये प्रवेश घेतलेले विद्यार्थी विद्यापीठाच्या नियमाप्रमाणे कॅटगरी C च्या रिपीटर विद्यार्थ्यांसाठीच्या शेवटच्या परीक्षा खालीलप्रमाणे आयोजित केल्या जातील.<br>द्वितीय वर्ष - डिसेंबर २०१७</td><td rowspan="4">व्दितीय वर्ष (बॅकलॉग परीक्षा)</td><td colspan="3">कॅटगरी C च्या प्रथम वर्षाची बॅकलॉग परीक्षा यापुढे घेण्यात येणार नाहीत याची कृपया नोंद घ्यावी.<br><u>या कॅटगरीचा बॅकलॉग राहिलेल्या विद्यार्थ्यांनी त्वरित बहिस्थः शिक्षण विभागाशी संपर्क साधावा.</u><br>संपर्क क्र.- ०२०-२४४०३०६०/२४४०३०६६.</td></tr>
<tr><th rowspan="2">उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी सूचना</th><th colspan="2">व्दितीय वर्ष FAIL/ATKT प्राप्त विद्यार्थ्यांसाठी सूचना</th></tr>
<tr><th>अंतर्गत मूल्यमापनाचा बॅकलॉग असलेले विद्यार्थी</th><th>परीक्षेचा बॅकलॉग असलेले विद्यार्थी</th></tr>
<tr><td>प्रथम व द्वितीय दोन्ही वर्ष उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनी पदवी प्रमाणपत्रासाठी अर्ज करावा. (प्रोव्हिजनल पासिंग सर्टिफिकेट सोबत जोडले आहे.)सदर अर्ज भरून रु. ३०० इतक्या पदवीप्रदान शुल्कासोबत ३० जुलै २०१७ पर्यंत परीक्षा विभागात पाठवावा.</td><td>*व्दितीय वर्षाच्या बॅकलॉगसाठी परीक्षा अर्ज भरावा. त्यास गुणपत्रिकेची स्वयंसाक्षांकित प्रत जोडावी आणि रु. ५० प्रति विषय याप्रमाणे शुल्क भरावे.<br>*परीक्षा अर्ज सादर करण्याची अंतीम तारीख १० जुलै २०१७ (विना विलंब शुल्क) १७ जुलै २०१७ (विलंब शुल्कासह).<br>* व्दितीय वर्षाचे गृहपाठ सादर करावेत.<br>* व्दितीय वर्षाचे गृहपाठ सादर करण्याची अंतीम तारीख -१५ ऑक्टोंबर २०१७ (विना विलंब शुल्क), ३१ ऑक्टोंबर २०१७ प्रति विषय रु. ५०/- विलंब शुल्कासह (प्रकल्पासाठी बॅकलॉग शुल्क रू.१००/- विलंब शुल्क रु. १००/-)</td><td>*व्दितीय वर्षाच्या पेपरची परीक्षा पुन्हा देण्यासाठी<br>* बॅकलॉगाचा फॉर्म भरून रु. १०० प्रति विषय इतके शुल्क भरावे. अर्जास गुणपत्रिकेची स्वयंसाक्षांकित प्रत जोडावी.<br>* अर्ज भरण्याची अंतीम मुदत - १० जुलै २०१७ (विना विलंब शुल्क) १७ जुलै २०१७ (विलंब शुल्कासह).</td></tr>
</table>

**प्रा. नीलिमा कुलकर्णी**
**अभ्यासक्रम समन्वयक**